# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☎ २५६५६२३४ Email:ropune@dtemaharashtra.gov.in Web Site :- www.ropune.org.in


जा.क्र. तंशिविकापु/विवि/डि.बी.टी.पोर्टल/ २०१९/4834 दिनांक :- 26 NOV 2019

प्रति,

प्राचार्य/संचालक

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था,

विषय :- सन 2019-20 साठी शिष्यवृत्ती योजनांच्या अमलबजावणीबाबत...

संदर्भ :- १.या कार्यालयाचे पत्र क्र जा.क्र.तंशिविकापु/विवि/डि.बी.टी.पोर्टल/ २०१९/४५६० दिनांक ०६/११/२०१९

२. संचालनालयाचे पत्र क्र 18/तशिस/MCM/डीबीटी/2019/520 दिनांक 20/11/2019

उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे प्राप्त निर्देशानूसार सर्व संस्थाना सुचित करण्यात येते की, महाडीबीटी पोर्टल वरील

१.राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

२.डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भता योजना

३.राज्य शासनाची अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना (भाग -१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

व केद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती योजना या योजनांसाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज स्विकारण्यासाठी दिनांक ३०/११/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तरी याबाबत सर्व संस्थाना सुचित करण्यात येते की, सदरच्या मुदतीमध्ये सर्व पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घ्यावेत. **तसेच संस्थाना तपासणीसाठी दिनांक १६/१२/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये (Clerk/Principal Login) विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता विहीत मुदतीत निकाली काढावेत.**

**सदर मुदतीनंतर कोणतेही अर्ज तपासणीसाठी प्रलंबित राहीले किंवा कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहीला तर याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्याची राहील. अर्ज तपासणीसाठी संस्थांना यापुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही यांची नोंद घ्यावी.**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे